




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# एक महिन्यात बोगस जन्मदाखले ताब्यात घ्या

- डॉक्टर आणि संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा
- नवनिर्वाचित महापौरांनी पहिल्याच बैठकीत बांग्लादेशी विरोधात ॲक्शन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईमध्ये बोगस जन्मदाखल्यांच्या तक्रारींमुळे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी महापालिका प्रशासनाला जेरीस आणलेले असतानाच आता नवनिर्वाचित महापौरांनी आपली पहिलीच बैठक या विषयावर घेवून आरोग्य विभागाला चांगलेच फैलावर घेतले. या बैठकीमध्ये आरोग्य विभागाला सूचना देत महापौर रितू तावडे यांनी अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या नागरिकांना दिलेली बोगस २३७ जन्म प्रमाणपत्र आरोग्य विभागाने एक महिन्याच्या आत ताब्यात घ्यावी असे निर्देश महापौरांनी यावेळी दिले. बांग्लादेशी फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचा निर्धार महापौर रितू तावडे यांनी काही दिवसापूर्वी व्यक्त केला होता. त्याच अनुषंगाने महानगरपालिका मुख्यालयातील महापौर दालनात शुक्रवारी १३ फेब्रुवारी २०२६ संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत नवनिर्वाचित महापौरांनी सूचना केल्या.



याप्रसंगी उप महापौर संजय घाडी, भाजपचे गटनेते गणेश खणकर, माजी खासदार किरीट सोमय्या, नगरसेवक प्रकाश गंगाधरे, निल सोमय्या, अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) शरद उघडे, कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ.दक्षा शहा तसेच संबंधित तहसीलदार, परवाना विभागाचे व पोलीस विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपायुक्त शरद उघडे यांनी या बैठकीत २३७ प्रमाणपत्र पोर्टलवर रद्द करण्यात आले असल्याची माहिती दिली. परंतु अवैधरित्या प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या संबंधित डॉक्टर व संबंधित आरोग्य अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी महापौरांनी दिले. आतापर्यंत ८ जणांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्यात आली असली तरी उर्वरितांवर सोमवारपासून कारवाई करण्याचे निर्देशही महापौरांनी दिले. विलंबित प्रकरणात २१ दिवसांनंतर जन्मप्रमाणपत्र वितरण करण्यात आली असून त्यांची फेर चौकशी करण्याचे निर्देशही त्यांनी केली.

तसेच २ वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून इतरांवर कारवाई करण्याचे निर्देशही दिले.१ जानेवारी २०१६ नंतरचे संपूर्ण दस्तऐवज तपासण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी बोगस जन्म प्रमाणपत्र ताब्यात घेऊन संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

## थोडक्यात...




### खलिस्तानी नेता पन्नूच्या हत्येचा कट

मुंबई (समर्थ गांवकरी) : खलिस्तानवादी आणि अमेरिकन नागरिक असलेल्या गुरपतवंत सिंग पन्नूच्या हत्येचा अयशस्वी कट रचल्याचा आरोप असलेल्या भारतीय नागरिक निखिल गुप्ता यांना अमेरिकेतील न्यायालयाने दोषी ठरवले आहे. निखिल गुप्ता यांनी मॅनहॅटन फेडरल कोर्टात आपला गुन्हा कबूल केल्याचे निवेदन अमेरिकेच्या न्याय विभागाने जाहीर केले आहे. गुप्ताने एका भारतीय सरकारी कर्मचाराच्या निर्देशानुसार हत्येचा कट रचला होता. त्याला 29 मे रोजी शिक्षा सुनावण्यात येणार आहे.

### महाशिवरात्रीला घृष्णेश्वराचे 'गाभारा दर्शन' सुरुच राहणार

वेरूळ (समर्थ गांवकरी) : महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर बारावे ज्योतिर्लिंग असलेल्या घृष्णेश्वर मंदिरातील दर्शनाबाबत प्रशासनाने आपला निर्णय बदलला असून भाविकांना मोठा दिलासा दिला आहे. दरवर्षी होणारी अलोट गर्दी लक्षात घेता प्रशासनाने सुरुवातीला गाभारा दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र आता हा निर्णय मागे घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आता महाशिवरात्रीला येणाऱ्या लाखो शिवभक्तांना पूर्वीप्रमाणेच थेट गाभाऱ्यात प्रवेश मिळणार आहे. भाविकांना केवळ दर्शनच नाही, तर महादेवाच्या पिंडीला स्पर्श करून दर्शन घेता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रशासनाच्या या सकारात्मक निर्णयामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, सुलभ दर्शनासाठी आता मंदिर प्रशासनाकडून विशेष तयारी केली जात आहे.

### मुख्यमंत्री एकाच आठवड्यात दोनदा दिल्लीमध्ये

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी) : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर आहेत. एकाच आठवड्यात ते दोनदा दिल्ली दौऱ्यावर असल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अस्थिरतेचे ढग दाटले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणासंदर्भात जोरदार चर्चा सुरु आहे. तसे घडल्यास महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलू शकतात. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दिल्ली दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

# मंत्रिपद काय चाटायचंय का? : नाईकांचा शिंदेंवर अप्रत्यक्ष संताप

**नवी मुंबई: (समर्थ गांवकरी)**

भाजप नेते, वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद पुन्हा एकदा समोर आला आहे. 'मला लाज वाटते, ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्यातील नगरविकास विकास खात्याच्या लोकांनी अशा प्रकारचं कर्मदरिद्री काम केलं आहे. माझा राग शांत करायचा असेल, तर सर्व भूखंड परत करा' अशा शब्दात नाईकांनी अप्रत्यक्षपणे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर शरसंधान साधलं आहे. मी जर नवी मुंबईकरांसाठी चांगलं काम केलं नाही, तर मंत्रिपद काय चाटायचं आहे का? असा सवाल गणेश नाईक यांनी उपस्थित केला. वाशीत झालेल्या जनता दरबारात गणेश नाईक यांनी सिडको आणि महापालिका अधिकाऱ्यांवरही ताशेरे ओढले. नवी मुंबईकरांच्या सुविधेसाठी



भूखंड मागितले होते, ते बिल्डरांच्या घशात घातले जात आहेत. नगर विकास खात्यातील लोकांनी हा कर्मदरिद्रीपणा केला आहे, जर चांगलं काम केलं नाही, तर मंत्रिपद चाटायचं आहे का? असा सवाल गणेश नाईक यांनी केला.

हॉस्पिटल, शाळा, बागांसाठी भूखंड मागितले ते दिले नाहीत. काही दलालांनी ते बिल्डरांच्या घश्यात घातले. मला या गोष्टीची लाज वाटते, की ज्या मंत्रिमंडळात मी आहे, त्यातल्या नगर विकास विभागाच्या लोकांनीच असला कर्मदरिद्रीपणा केला आहे. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगणार आहे, की तुमची इच्छा असेल तर त्या ठिकाणी सिडको-एमआयडीसीकडून जनतेच्या हितासाठी असलेले भूखंड देण्याची व्यवस्था करा, म्हणजे माझा राग हळूहळू कमी होईल, असंही गणेश नाईक म्हणाले.

ज्या गोष्टीसाठी गणेश नाईक आमदार झाला, मंत्री झाला, ते जर जनतेसाठी मी बोलू शकलो नाही, मिळवू शकलो नाही, तर ते मंत्रीपद काय चाटायचं आहे का? मंत्रिपद पक्षाने दिलं मी भारतीय जनता पक्षाचा आभारी आहे, परंतु याचा अर्थ ते मुका होऊन बसण्यासाठी मी स्वीकारलेलं नाही, असंही पुढे गणेश नाईक यांनी म्हटलं आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

अजित पवारांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी आणि खासदार सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यानंतर अजित पवारांकडे असलेली जवळपास सर्व खाती सुनेत्रा पवारांना मिळाली होती. केवळ अर्थ खातं मात्र राष्ट्रवादीकडे देण्यात आलं नव्हतं. त्यामुळे दादा जाताच महायुतीत राष्ट्रवादी बॅकफुटला गेल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र आता मोठी माहिती समोर आली आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना राज्यात आणखी एक मोठी जबाबदारी मिळणार आहे. येत्या तीन ते चार महिन्यांत राज्याचे वित्त आणि नियोजन खाते पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसकडे येण्याचे संकेत मिळत आहेत. अलीकडेच, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक पार पडली. याच बैठकीत अर्थखातं पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडं देण्याचा निर्णय झाला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आतापर्यंत विक्रमी ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प सादर केला होता.

त्यांच्या आकस्मिक निधनानंतर हे महत्त्वाचे खाते कोणाकडे द्यावे, याबाबत पेच निर्माण झाला होता. राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या सखोल चर्चेनंतर, तात्पुरत्या स्वरूपात हे खातं मुख्यमंत्र्यांनी स्वतःकडेच ठेवावं, असा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, आता पुन्हा एकदा हे खाते राष्ट्रवादीला सुपुर्द करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

# भारत-पाक मॅच रद्द झाल्यास सुपर ८ मध्ये कुठली टीम जाणार ?


**कोलंबो : (समर्थ गांवकरी)**



आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये रविवार १५ फेब्रुवारी २०२६ रोजी कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियममध्ये भारत आणि पाकिस्तान यांचा सामना होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होणार आहे. हा यंदाच्या वर्ल्डकपमधील २७ वा साखळी सामना असेल. क्रिकेटप्रेमींचे लक्ष असलेल्या या हायव्होल्टेज सामन्याआधीच एक चिंता वाढवणारी बातमी आली आहे. टी ट्वेंटी वर्ल्डकपमधील भारत - पाकिस्तान सामन्यावर पावसाचे सावट घोंगावत आहे. यामुळे क्रिकेटप्रेमी चिंतेत आहेत. श्रीलंकेच्या हवामान विभागाने भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यादरम्यान पावसाची शक्यता वर्तविली आहे. आग्रेय बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. यामुळे कोलंबोत पावसाची ९३ टक्के शक्यता आहे. सामन्याच्या वेळेत म्हणजेच संध्याकाळी सात पासून पुढे पावसाची शक्यता फक्त नऊ टक्के आहे. पण संध्याकाळपर्यंत पावसाची शक्यता ४९ टक्के आहे. तापमान २६ ते २८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. जर सामन्यावेळी किंवा सामन्याआधी पाऊस पडल्यामुळे सामन्याच्या नियोजनावर परिणाम झाला तर हायव्होल्टेज सामन्याची मजा कमी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# ठाण्याच्या खाडीवर बनवणार कोस्टल रोड

- आठ महिन्यांत मोठा टप्पा पूर्ण; थेट वाढवण बंदर, कर्नाटक पोहचवणार मार्ग



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील कोस्टल रोडच्या पाठोपाठ ठाण्यातही खाडी किनारा मार्ग उभारणीच्या कामाला गती मिळाली आहे. Thane Coastal Road-1 या प्रकल्पाचं 50 टक्के काम पूर्ण झालं असून काम सुरु होताच 8 महिन्यांतच महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला. एमएमआरडीएने आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून ही माहिती दिली. यावेळी त्यांनी व्हिडीओही शेअर केला. या केस्टल रोडमुळे ठाण्यातील वाहतूक कोंडीची मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. ठाणे कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्यात खारेगाव - गायमुखदरम्यान काम सुरु आहे. हा टप्पा 13.45 किमी लांब असून डिसेंबर 2028पर्यंत या मार्गावर वाहतूक सुरु होण्याचे संकेत आहेत. तसेच हा संपूर्ण मार्ग सहा पदरी असून, ठाण्याती वाहतूक कोंडी सोडवण्यात मदत होणार आहे. मुंबईनंतर ठाणे आणि नवी मुंबईतही सागरी किनारा मार्ग बांधण्याचं काम हाती घेण्यात आलं आहे. पहिल्या टप्प्यात गायमुख - खारेगाव मार्ग उभारण्यात येत असून, पुढील टप्प्यात बाळकूम-आनंदनगर मार्ग उभारण्यात येणार आहे. हा मार्ग एकूण 7 किमी लांब असणार आहे. घोडबंदर, भिवंडी मार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यात मोठी मदत होणार आहे.

या उन्नत मार्गासाठी पायाभरणीचं काम पूर्ण झालं आहे. ठाणे खाडीदरम्यान पूल उभारून हा मार्ग तयार केला जाणार आहे. गायमुखमध्ये हा मार्ग गायमुख-फाऊंटन हॉटेल भुयारी मार्गाला थेट जोडणार आहे. यामुळे ठाणे-भाईंदर कनेक्टीव्हिटीला चालना मिळणार आहे. या दोन्ही मार्गांमुळे घोडबंदर परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

तयार झाल्यावर हा मार्ग वाढवण बंदर, जेएनपीटी, उत्तर महाराष्ट्रासह चक्क कर्नाटकलाही जोडणार आहे. इतकेच नव्हे तर या संपूर्ण कोस्टल रोडमध्ये ठाण्यातील अनेक अन्य प्रकल्पांचाही समावेश केला जाणार आहे. भविष्यात तयार होणारी Thane Ring Metro , ठाणे कोस्टल रोड - 2 ला हा मार्ग थेट जोडणी देणार आहे. तसेच, साकेत-अमाने उन्नत मार्ग, कासरवडवली-खारभाव मार्ग अशा अनेक मार्गांना हा कोस्टल रोड जोडणार आहे. हा मार्ग तयार होताच ठाणे-बाळकुम अंतर केवळ 15 मिनिटांमध्ये पार होणार आहे.

# १ ते ८ विच्या विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

## राज्यसरकारच्या मोठा निर्णय!

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

राज्यसरकारकडून एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता पहिले ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार आहेत.

सविस्तर माहितीनुसार, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येणार आहे. यासाठी १६५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत ही दप्तरं पुरवण्यात येणार आहेत. या योजनेचा राज्यातील ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाला आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने म्हटले आहे.



ही योजना 'विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे' या विद्यमान योजनेंतर्गतच राबवली जाणार आहे. दप्तर हे शैक्षणिक साहित्याचा भाग असल्याने त्यासाठीचा खर्च संबंधित निधीतूनच करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. या दप्तरांच्या खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले असून, खरेदी प्रक्रियेत उद्योग विभागाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वितरित निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाला सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

# आय लव्ह यू रिया, कुठल्या तरी जन्मात पुन्हा भेटू

## शेवटचा मेसेज केला, पुण्यातील IT कर्मचाऱ्याने लोणावळ्यात आयुष्य संपवलं

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कंपनीतील सहकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून पुण्यातील बाणेरमधील एका कंपनीतील कर्मचाऱ्याने लोणावळ्यातील टायगर पॉइंटवरून अडीचशे फूट खोल दरीत उडी मारून आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी १२ फेब्रुवारीला सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलिस ठाण्यात आठ जणांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. टायगर पॉइंटवर आत्महत्येची दीड महिन्यातील ही तिसरी घटना आहे. वीरेंद्र वाल्मीकी सिन्हा (वय ३३, सध्या रा. कासारसाई, ता. मुळशी, मूळ रा. मानकापूर, नागपूर) असे आत्महत्या



केलेल्याचे नाव आहे. त्यांची पत्नी रिया यांनी तक्रार दिली. मिलिंद दाणी, आचल श्रीवास्तव, सिद्धांत सपकाळ, अभिषेक बिरोले, श्रद्धा पोद्दार, ममता, संस्कृती, कनोजे (पूर्ण नाव, पत्ते माहिती नाहीत) यांचा फिर्यादीत उल्लेख आहे.

सिन्हा बाणेर येथील विल्सकाड कंपनीत नोकरीस होते. रिया यांचा वाढदिवस असल्याने त्या आपले नातेवाइक व मित्राच्या घरी बुधवारी मुक्कामी होत्या. गुरुवारी पहाटे पाचच्या सुमारास वीरेंद्र यांनी त्यांच्या मोबाइलवर मेसेज पाठवला. रिया यांनी तो मित्र दीपक सिंह यांना दाखवला. त्यानंतर रिया, दीपक, वैभव चव्हाण, अजिंक्य परब, प्रियांका घोष हे कारने टायगर पॉइंटवर पोहोचले. तेथे वीरेंद्र यांची गाडी दिसली. रिया यांनी वीरेंद्र यांचा मोबाइल तपासला असता त्यांनी कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापक प्रीती शर्मा व जयदीप नंदा यांना मेलवर व्हिडिओ पाठवल्याचे आढळले. त्यात आपल्या मृत्यूला आठ जण कारणीभूत असल्याचा उल्लेख होता. त्यानंतर रिया सिन्हा यांनी पोलिसांना कळवले.

# महात्मा फुले प्राथमिक शाळेत डिजिटल वर्गाची सुरुवात

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



संत गाडगेबाबा शिक्षण संस्था, कंधार संचलित महात्मा फुले प्राथमिक शाळेत डिजिटल शिक्षणाचा नवा अध्याय सुरू झाला असून इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी गुगल टीव्हीद्वारे ऑनलाइन व दृश्याधारित शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून दि.13 फेब्रुवारी रोजी संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेचे सचिव चेतनभाऊ केंद्रे यांच्या हस्ते उदघाटन करून शुभारंभ करण्यात आला.या उपक्रमामुळे महात्मा फुले प्राथमिक शाळा तालुक्यातील डिजिटल शिक्षण देणारी आदर्श शाळा ठरणार आहे.

या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डी.एन. केंद्रे यांनी निधी उपलब्ध करून दिला असून संस्थेचे सचिव चेतनभाऊ केंद्रे, संचालिका तथा माजी नगराध्यक्षा, विद्यमान नगरसेविका सौ. अनुराधा केंद्रे यांनी प्रत्यक्ष चारही वर्गांसाठी गुगल टीव्ही उपलब्ध करून देत हा उपक्रम साकार केला. या बद्दल विद्यार्थी व शिक्षकांच्या वतीने संस्थेचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

डिजिटल वर्गाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मराठी, इंग्रजी व गणित या विषयांचे अध्यापन अधिक आकर्षक, समजण्यास सोपे आणि दर्जेदार पद्धतीने करता येणार आहे. चित्र, व्हिडिओ आणि ॲनिमेशनच्या साहाय्याने शिकविल्यामुळे विद्यार्थ्यांची अभ्यासातील रुची वाढण्यास मदत होणार असल्याची माहिती उदघाटक चेतन भाऊ केंद्रे यांनी यावेळी दिली.

या संदर्भात मुख्याध्यापक डी. जी. वाघमारे यांनी सांगितले की, "डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या संकल्पना अधिक दृढ होतील. शिक्षक देखील या सुविधेचा दर्जेदार वापर करून अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील राहतील."

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत निश्चितच भर पडणार असल्याचे यावेळी लोकार्पण सोहळ्यात सांगितले. यावेळी जे.जी केंद्रे, जी. टी. गुट्टे, सौ. कागणे यु.एम., आगलावे ए. बी.केंद्रे आर एस. माणिक बोरकर,ज्ञानेश्वर केंद्रे आदीची यावेळी उपस्थिती होती.



# नगराध्यक्ष दंडवे व तहसीलदार गुंडमवार यांच्या हस्ते भोकरमध्ये मोफत एम्ब्युलन्स सेवेचा शुभारंभ

**भोकर : (समर्थ गांवकरी)**

रस्ते अपघातांमध्ये जखमी नागरिकांना तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी, या उद्देशाने जगद्गुरु नरेंद्राचार्यजी संस्थान, नाणीज यांच्या वतीने राष्ट्रीय महामार्गांवर सुरू असलेल्या मोफत ५४ एम्ब्युलन्स सेवेतील एक एम्ब्युलन्स भोकर तालुक्यासाठी उपलब्ध झाली आहे. या सेवेचा शुभारंभ बुधवारी तहसील कार्यालयासमोर नगराध्यक्ष भगवानराव दंडवे व तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

तालुकाध्यक्ष गंगाधर पडवळे, साईनाथ बंडोड यांच्यासह तालुका कार्यकारिणीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही सेवा उपलब्ध झाली असून अपघातग्रस्त व गरजू रुग्णांसाठी ती जीवनदायी ठरणार आहे. कार्यक्रमात नगराध्यक्ष दंडवे, तहसीलदार गुंडमवार, नगरसेवक राजेश्वर देशमुख यांनी संस्थेचे समाजोपयोगी व प्रेरणादायी कार्य असल्याचे नमूद केले. संपादक उत्तम बावळे, डॉ. मनोज गिमेकर, डॉ. फेरोज इनामदार व युवा नेते संदीप पाटील गौड यांनीही या सेवेचे कौतुक केले. या एम्ब्युलन्समुळे भोकर व परिसरातील तीन ते चार तालुक्यांतील नागरिकांना आपत्कालीन वैद्यकीय सेवेत मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी नगरसेवक, तालुका सेवा समितीचे पदाधिकारी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.अशोकराव चव्हाण यांची आक्रमक भूमिका

## प्रकल्प संचालकांना दिले तातडीचे आदेश

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



दाभड ता. अर्धापूर येथील राष्ट्रीय महामार्गावर सातत्याने होणारे अपघात आणि नागरिकांचा वाढता संताप लक्षात घेता, माजी मुख्यमंत्री , खासदार अशोकराव चव्हाण यांनी या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप केला आहे. दाभड ग्रामस्थांनी पुलाच्या मागणीसाठी पुकारलेल्या 'चक्का जाम' आंदोलनानंतर, खासदारांनी महामार्ग प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचे निर्देश दिले आहेत.

दाभड परिसरातील अपघातांच्या मालिकेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष होता. या पार्श्वभूमीवर खा. अशोकराव चव्हाण यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक महेश पाटील यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. त्यांनी केवळ अपघातांबाबत चिंता व्यक्त केली नाही, तर यावर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून भुयारी मार्ग मंजूर करण्याबाबत आग्रही मागणी केली. तर सदर काम तातडीने सुरू करा लोकसंख्येच्या सुरक्षिततेचा प्रश्न असल्याने या कामात कोणतीही दिरंगाई नको. खासदार अशोकराव चव्हाण यांच्या या सक्रिय हस्तक्षेपामुळे दाभडच्या सुरक्षिततेचा प्रश्न आता मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

खा. अशोकराव चव्हाण सध्या दिल्ली येथे असून, या मागणीला गती देण्यासाठी ते केंद्र सरकारच्या संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करणार आहेत. लोकप्रतिनिधींच्या या तत्परतेमुळे दाभड व परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.



# कुटे यांचा सत्कार

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील हॉस्पिटल भेटीदरम्यान शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पुणे जिल्हा प्रमुख अक्षय कुटे यांचा मंगेश चिवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अक्षय कुटे यांनी आजपर्यंत केलेल्या उल्लेखनीय वैद्यकीय व सामाजिक कार्याबद्दल यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळवून देणे, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना उपचारासाठी मार्गदर्शन , शस्त्रक्रिया, औषधोपचार तसेच शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

# अधिकारी कर्मचारी जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये अकोल्यातील महिलांचे उल्लेखनीय यश

## अधिकारी व कर्मचारी जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये महिलांची नेत्रदीपक कामगिरी

■ जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफीवर अकोलेचेच नाव

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ नुकत्याच संपन्न झाल्या. तालुक्यातील महिलांनी उज्वल यश संपादन करत जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी तालुक्याला मिळवली.

पारितोषिक वितरण जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी साहेब यांच्या हस्ते, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके व सर्व विभागांचे खातेप्रमुख यांच्या उपस्थितीत पार पडले.

या स्पर्धांमध्ये पंचायत समिती अकोले येथील विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून क्रीडा व सांस्कृतिक प्रकारांत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट व नेत्रदीपक कामगिरी केली.

जिल्हास्तरीय स्पर्धेतील सामूहिक नृत्य प्रकारात प्राजक्ता मोटे, माधवी गोरे, सविता कचरे (विस्तार अधिकारी, अकोले), सुनीता वलटे, स्मिता धनवटे, समता कराळे, पौर्णिमा दारोळे, रत्नमाला शिंदे (कृषी अधिकारी, अकोले) व सुमन खतोडे यांनी "शिवरायांची युगत" या कार्यक्रमात आपली कला सादर करून प्रथम क्रमांक पटकावला. वैयक्तिक नृत्य स्पर्धेत प्राजक्ता मोटे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. क्रीडा प्रकारांत महिला बास्केटबॉल संघाने प्रथम क्रमांक मिळवत संघभावना व कौशल्याचे उत्कृष्ट दर्शन घडवले. टेबल टेनिस एकेरी स्पर्धेत स्मिता धनवटे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर टेबल टेनिस दुहेरी स्पर्धेत स्मिता धनवटे व माधवी गोरे यांनी प्रथम क्रमांक मिळवून यशाची पुनरावृत्ती केली. १०० मीटर धावणे प्रकारात समता कराळे यांनी द्वितीय स्थान मिळवले, तर बॅडमिंटन दुहेरी स्पर्धेत सुनीता वलटे व स्मिता धनवटे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

सांस्कृतिक कार्यक्रमातील स्टेजवरील सादरीकरण पाहून मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी स्वतः उभे राहून टाळ्यांच्या गजरात महिला शिक्षकांचे कौतुक केले. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमर माने साहेब, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी महिला कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष कौतुक केले.

महिला शिक्षकांनी केवळ अध्यापनातच नव्हे तर कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही आपला ठसा उमटवला असल्याचे गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी काढले.

# ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून कळसुबाई शिखरावर स्वच्छता

■ ऐतिहासीक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन कार्यशाळेचे आयोजन

**राजूर : (समर्थ गांवकरी)**




महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई आणि परिसराची स्वच्छता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केली, निमित्त होते, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि ॲड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दोन दिवशीय जिल्हास्तरीय कार्यशाळा 'ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन' या विषयावरील आयोजन करण्यात आले असता, कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच संगमनेर-अकोले तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कळसुबाई शिखर ते कळसुबाई पायथा अशा अवघड मार्गावरील तसेच परिसरातील प्लास्टिक बाटली आणि प्लास्टिक साहित्य असा 30 गोण्या कचरा गोळा केला. तो पायथ्याला एका ठिकाणी संकलित करून कळसुबाई -हरीचंद्र गड अभयारण्य वनक्षेत्र भंडारदरा या विभागाकडे जमा करण्यात आला. तसेच महाराष्ट्र नव्हे तर अवघ्या भारतातून कळसुबाई शिखराला भेट देणाऱ्या पर्यटकांना प्लास्टिक मुक्ती व पर्यावरण संरक्षण समतोल राखण्याचा संदेश दिला. पर्यावरण राखण्यात पर्यटकांची महत्त्वाची भूमिका आहे. हा संदेश देऊन पर्यावरणपूर्वक पर्यटन करावे असे आवाहन केले. ही स्वच्छता मोहीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे समन्वयक डॉ. वाल्मिक गिते, डॉ. एल. बी. काकडे, प्रा. जी. एस. कुसमुडे आणि प्रा. योगिता वाकचौरे यांनी यशस्वी पूर्ण केले. यासाठी कळसुबाई-हरिश्चंद्र अभयारण्यचे वनपरिक्षेत्र अधिकारी दत्तात्रय पडवळे, रुपेश गावित, वनरक्षक चंद्रकांत तळपाडे आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

> पर्यावरण संतूलन राखण्यासाठी झाडे लावणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. "झाडे लावा, झाडे वाचवा," "प्लास्टिक हटाव, पर्यावरण वाचवा," आणि "निसर्ग टिकवा, भविष्य वाचवा" पर्यावरणाचे रक्षण, हेच मानवी जीवनाचे लक्षण असून भविष्य सुरक्षीत करण्यासाठी निसर्गाशी मैत्री करा.ऐतिहासीक वारसा स्थळांचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे.
>
> **-समन्वयक डॉ. वाल्मिक गिते**

# जावयास पाच वर्षाची शिक्षा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

सासऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या जावई आरोपी शेख यादुल शेख लतिफ (राहणार कुरूळा ता.कंधार) याला कंधारचे जिल्हा व सत्र न्यायाधीश एन. एम. पाटील यांनी पाच वर्षाची शिक्षा व पाच हजार रूपय दंड अशी शिक्षा ठोठावली. आरोपी शेख यादुल व त्याची पत्नी शेख फरजाना बेगम यांच्यात काही कारणाने आपसात जमत नव्हते. त्यामुळे फरजाना ही आरोपी पासून विभक्त राहत होती. फरजाना आपल्या मुलीला भेटण्यासाठी वडील शेख मुस्तफा शेख कासिम (वय ६० वर्ष) यांना सोबत घेऊन कुरुळा या गावी भेटण्यास गेली असता आरोपी शेख यादुल सोबत वाद झाला. आरोपीने फर्शीच्या तुकड्याने सासऱ्याच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले. शेख मुस्तफा यांना उपचारासाठी नांदेड येथील खाजगी दवाखान्यात दाखल केले असता त्यांचा उपचार दरम्यान मृत्यू झाला होता.

# अवैध मटका व जुगारा विरोधात निवेदन

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट शहरातील वाढत्या अवैध मटका व जुगार व्यवसाय विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने (दि.11) रोजी किनवट पोलिस स्टेशन येथे निवेदन सादर करण्यात आले. शहरप्रमुख प्रशांत कोरडे व माजी शहरप्रमुख संतोष येलचवार, प्रभू कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन पोलिस निरीक्षक गणेश कराड यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मागील अनेक महिन्यांपासून किनवट शहरातील प्रमुख बाजारपेठा व वर्दळीच्या भागात राजरोसपणे मटका व जुगाराचे अड्डे सुरू असून त्यामुळे गोरगरीब कुटुंबे आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहेत. शहरातील भाजीपाला मार्केट, मटन मार्केट, बसस्थानक परिसर, सुभाषनगर, समतानगर, हमाल कॉलनी, रेल्वेस्टेशन, गंगानगर तसेच आठवडी बाजार आणि प्रमुख चौकांमध्ये 'मिलन', 'श्रीदेवी', 'टाईमबाजार', 'कल्याण' आदी नावाने मटका बुकिंग सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील मजूर व तरुण वर्ग दाम-दुप्पट होण्याच्या अपेक्षेने आपली रोजंदारीची रक्कम मटक्यात लावत असून त्यामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येत असल्याचेही नमूद करण्यात आले. या अवैध धंद्यांमध्ये दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचा दावा करत संबंधितांनी स्थानिक बेरोजगार तरुणांना हाताशी धरून जाळे उभारल्याचा आरोप केला आहे.

मटका अड्ड्यांवर पैशांच्या देवाणघेवाणीवरून भांडणे, तंटे होत असून यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. पूर्वी किरकोळ वादाचे पर्यवसान जातीय तणावात झाल्याच्या घटनांचाही उल्लेख करण्यात आला. अवैध जुगार अड्ड्यांवर दिवसरात्र जुगार सुरू असून महिला, विद्यार्थी, व्यापारी व सुज्ञ नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली.

# खून प्रकरणातील आरोपीस पाच वर्षांचा सश्रम कारावास

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

■ अतिरीक्त सत्र न्यायालयाचा निकाल

पोलीस स्टेशन, कंधार हद्दीत दिनांक ४ जून २०१६ रोजी यातील फिर्यादी महिला यांनी तक्रार दिली की, आरोपी नामे शेख यादुल शेख लतीफ, शेख कलीम शेख लतीफ, शेख लतीफ शेख नवाब, शेख खातीजा शेख लतीफ यांनी त्यांचे वडील नागे मुस्तफा कासीम शेख वय ५५ वर्षे रा.लातुर यांना मारहाण करुन त्यांचा खुन केला वगैरे प्रमाणे तक्रारीवरून पोलीस स्टेशन, कंधार येथे गु.र.नं. १२५ / २०१६ कलम ३०२, ३२३, ५०४, ५०६ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि एस.ए.पठाण यांनी करून भक्कम पुरावे गोळा करून मा.न्यायालयात आरोपी विरूध्द दोषारोप सादर केले. सदर प्रकरणात अतिरीक्त सत्र न्यायाधीश १ कंधार एम.एन. पाटील यांनी सरकार पक्षाच्या वतीने पुरावे ग्राहय धरून आरोपी नामे शेख यादुल शेख लतीफ रा.कुरुळा ता.कंधार यास कलम ३०२, ३२३, ५०४, ५०६ भादवी अंतर्गत ५ वर्ष सश्रम कारावास व ५००० रूपये दंड, अशी शिक्षा ठोठावली आहे. अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी न्यायालयात चालू असलेल्या खटल्यांमध्ये विशेष लक्ष देणे बाबत सुचित केले आहे. प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता एम.बी.कांगणे यांनी सरकार पक्षाची बाजु मांडली. संपूर्ण खटल्याच्या दरम्यान कोर्ट पैरवी अधिकारी म्हणुन सपोउपनि संजय मुंडे व पोकॉ/290 एकनाथ घुगे यांनी कामकाज पाहिले.

# सिन्नर वसतिगृहातील विद्यार्थिनींना भेडसावताहेत विविध समस्या

## प्रशासनाच्या जाचातून सुटका व्हावी, न्याय मिळवून घेण्यासाठी विदयार्थीनींची मनसे कडे धाव

**राजूर : (समर्थ गांवकरी)**



सिन्नर येथील मुलींच्या वसतिगृहात भयानक प्रकार मनसेचा हाती आले आहेत. जेवण पूर्णपणे बेचव,आळणी,तिखट,चपाती भाजलेली नसते.विद्यार्थिनींच्या मागणीनुसार जेवण देत नाही. वेळापत्रकानुसारही जेवण दिले जात नाही. हिरवा भाजीपाला कधीतरी दिला तर तोही चांगला बनवून देत नाही.जेवणाच्या ठिकाणी खूपच अस्वच्छता आहे. भातात सोंडे, उंदराच्या लेंड्या,केस अशा प्रकारच्या गोष्टी आढळून येतात.या गोष्टींमुळे जेवण करू वाटत नाही गृहपालाकडे खूप वेळा तक्रार करूनही जेवणामध्ये काहीच सुधारणा झाल्या नाही. वस्तीगृहात मंत्रीमंडळ नेमलेले आहे.आणि सर्व वसतिगृहातील कामे मंत्रीमंडळाकडून करून घेतात.विद्यार्थिनींची हजेरी पण मुली घेतात.आजारी मुलींना पण मुलीच दवाखान्यात घेऊन जातात. आणि इमर्जन्सी मध्ये कोणीही लक्ष देत नाही.वसतिगृहातील मंत्रीमंडळाच्या मुलीच बघतात. कोणत्याही छोट्या छोट्या गोष्टीवर गृहपाल मुलींना शिक्षा देतात.एवढे सगळे कर्मचारी असूनही सगळी वसतिगृहाची साफसफाई चे काम शिक्षेच्या नावाखाली करून घेतात.याचा परिणाम अभ्यासावर होतो. वसतिगृहाची सगळी साफसफाई मुलीच करतात.कर्मचारी नुसते बसून असतात मॅडम कडे काही प्रॉब्लेम्स सांगायला गेल्यावर मुलींची चुकी सांगून त्यांनाच शिक्षा देतात.पालकांसोबत बोलण्याची पद्धत उद्धट असते. शनिवार,रविवार मॅडम वसतिगृहात येत नाही शनिवार,रविवार मुलींना घरी जाऊन देत नाही. म्हणून शनिवार, रविवार मेडिकल सर्टिफिकेट देत नाही. ज्या दिवशी घरून येतो त्याच दिवसाचं मेडिकल सर्टिफिकेट आणायला लावतात त्यात खूप मुली लांबच्या आहेत त्यामुळे एका दिवसात आणणं शक्य होत नाही, यावरूनही विदयार्थीनींना शिक्षा दिली जाते. वसतिगृहाचे सर्व नियम पाळूनही समस्यांचे निरसन होत नाही.काही रूम रिकामी असूनही मुलींना एका गादीवर दोघींना झोपायला ,राहाव लागते. रूम मध्ये बेड नाही आणि मुलींना खाली झोपायला लागते. भंडार गृहात गादया असूनही त्यांना देत नाही.काही छोट्या छोट्या चुकांवरूनही ॲडमिशन रद्द करेल अशी धमकी देतात.पालकांना जर फोन केला तर धमकी देतात घरी जायला यायला मुलींचे आई किंवा वडील लागतील असं सांगितले आहे.आणि सख्खा भाऊ किंवा बहिणीसोबत पण सोडत नाही.१८ + मुलींनी त्यांच्या आई-वडिलांचा घरी जाण्या-येण्याचा स्टॅम्प दिलेला असूनही घरी सोडत नाही. वस्तीगृहात कॅम्पुटर असूनही मुलींना वापरायला देत नाही. कॅम्पुटर स्टोअर रूम मध्ये ठेवून दिले आहेत.मुलींना प्रोजेक्टच्या कामासाठी लागत असतात त्यांनी मागितल्यावर त्यांना दिले जात नाही.लायब्ररीमध्ये नवीन पुस्तके मागवलेले नाही आणि जुने पुस्तक मागितल्यावर वेळेवर देत नाही. फक्त सोमवारीच पुस्तक देतात. तेही त्यांना वेळ असेल तरच देतात. आठवडाभर लगेच मागून घेतले जातात. मुलींचे काही ऐकून घेत नाही. बाकीच्या हॉस्टेलच्या मुलींनी अकॅडमी ला आलेले आहेत त्यांना ग्राउंड चा टाईम साडेपाच ते सहा पर्यंतचा आहे त्यांना यायला सहा वाजतात मॅडम बोलतात की लवकर यायचं नाही तर अकॅडमी बंद करेल अशी धमकी देत असतात.गरम पाण्याचे गिझर बंद पडलेले आहेत.

# ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत संधी

पारनेर: (समर्थ गांवकरी)

लोकनाथ चषक माध्यमातून ग्रामीण भागातील खेळाडूंना राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार असून सुजित झावरे पाटील मित्र मंडळ व धर्मरक्षक प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या क्रिकेट स्पर्धा या ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंना राज्यस्तरीय व्यासपीठ मिळवून देणारे असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त निघोज येथील वेताळबाबा स्टेडियमवर गुरुवार दि.१२ ते रविवार दि.१५ पर्यंत क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार जगताप यांच्या हस्ते व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले यावेळी ते बोलत होते. चार दिवसांच्या या क्रिकेट स्पर्धेत परिसरातील तसेच शिरुर, पारनेर, अहिल्यानगर, पुणे, मुंबई परिसरातील क्रिकेट संघांनी भाग घेतला असून लाखो रुपये बक्षीसांची खैरात होणार असून लोकनाथ चषक जिंकण्यासाठी या स्पर्धा मोठ्या चुरशीने होणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून क्रिकेट असोसिएशनच्या अॅपेक्स कौन्सिल सदस्या अॅड.कमल सावंत, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ भास्करराव शिरोळे, युवासेना जिल्हाप्रमुख नितीन शेळके,



उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब माळी, उद्योजक कैलास कोठावळे, माजी सभापती दिपक पवार, उद्योगपती बाळासाहेब सालके, माजी सभापती दिपक पवार, माजी पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, पप्पू राजापुरे, रविंद्र पाडळकर, अरुण ठाणगे, सरपंच पंकज कारखिले,माजी सरपंच ठकारामशेठ लंके, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, खंडू भुकन , धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ, स्वप्नील आतकर,हर्षद ईधाटे आदी उपस्थित होते. आमदार जगताप यावेळी म्हणाले धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ यांनी लोकनाथ चषक माध्यमातून ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी या क्रिकेट स्पर्धेचा उपयोग होणार आहे. ग्रामीण भागात सातत्याने स्पर्धा होण्याची गरज आहे. तरच विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी खेळाडूंना मिळणार आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यावेळी म्हणाले महायुती सरकारच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्रीमंडळाने राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य केले आहे. धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ यांनी निघोज व परिसरात सामाजिक कामे करताना क्रिडा स्पर्धेत सहभागी होऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे. क्रिकेट पदाधिकारी कमल सावंत यांनीही या लोकनाथ चषक माध्यमातून होत असलेल्या या क्रिकेट स्पर्धेचे कौतुक केले आहे. आमदार संग्राम जगताप व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी जिल्ह्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत. खेळाडू आर्थिक सक्षम व्हावेत यासाठी आमदार जगताप यांनी त्यांना विविध ठिकाणी नोकऱ्या देण्याचे काम केले आहे.

# भिंगारमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न संसदेत

■ राष्ट्रीय महामार्ग ६१ वर उड्डाण पुल उभारणीची खा. नीलेश लंके यांची मागणी

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील भिंगार शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील तीव्र वाहतूक कोंडी आणि त्यामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांकडे खासदार नीलेश लंके यांनी संसदेत लक्ष वेधले. या महामार्गावरील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

खा. लंके यांनी सांगितले की, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या महत्त्वाच्या व्यापारी व औद्योगिक शहरांना जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ६१ हा अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे.



मात्र, भिंगार शहरातून जाताना या महामार्गावर सध्या दिवसभर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. विशेषतः भिंगार सिग्नल चौक आणि भिंगार अर्बन बँक चौक या ठिकाणी जड व सातत्याने होणाऱ्या वाहतुकीमुळे वारंवार वाहतूक ठप्प होत असल्याचे त्यांनी संसदेत नमूद केले.

हा महामार्ग भिंगार कॅन्टोन्मेंट क्षेत्र, बँका, शाळा तसेच दाट लोकवस्तीच्या भागातून जात असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. वाहतुकीच्या या विस्कळीत अवस्थेमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून पादचारी व दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. चौकांमध्ये बसवण्यात आलेले दुभाजक आणि इतर तात्पुरते उपाय सध्या अपुरे ठरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित करण्यासाठी कायमस्वरूपी व ठोस उपाययोजना आवश्यक असल्यावर भर देत, खा. नीलेश लंके यांनी रस्ते व महामार्ग मंत्र्यांना भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाला भिंगार शहरातील या संवेदनशील भागाचे तातडीने सखोल सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली. तसेच नागरिकांची सुरक्षा आणि वाहतुकीची सुलभता सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग ६१ वर भिंगार शहरातून अत्याधुनिक उड्डाण पुलाच्या बांधकामास प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी, अशी ठोस मागणी त्यांनी संसदेत केली.

# व्हॅलेंटाईन डे गिफ्टिंगची नवी ट्रेंड कॅलिफोर्निया बदामांना पसंती

मुंबई : (समर्थ गांवकरी)

व्हॅलेंटाईन डे आता फक्त मोठ्या भव्यते किंवा एका दिवसाच्या साजऱ्यापुरता मर्यादित राहिला नाही. आज गिफ्ट देणे अधिक वैयक्तिक, विचारपूर्वक आणि रोजच्या काळजीशी संबंधित झाले आहे. लोक आता फक्त आपल्या जीवनसाथीला नाही, तर मित्र, कुटुंब आणि स्वत:लाही या दिवशी खास वाटवू इच्छितात. अशावेळी लोक अशा गिफ्टला प्राधान्य देतात जे हृदयाशी जोडलेले असतात आणि रोजच्या जीवनात उपयोगीही पडतात. या बदलासोबत, लोक आता चॉकलेट आणि फुलांपेक्षा पुढे जाऊन नवीन आणि चांगले पर्याय निवडत आहेत. कॅलिफोर्निया बदाम एक समजदारीपूर्ण गिफ्ट पर्याय म्हणून उदयास येत आहेत — जे उत्कृष्ट चवीसह रोजच्या आरोग्याची देखील काळजी घेतात. हे सहजपणे दैनंदिन जीवनाचा भाग बनतात, ज्यामुळे हा असा



गिफ्ट होतो जो व्हॅलेंटाईन डे नंतरही दीर्घकाळ खास राहतो.

नैसर्गिकरित्या पोषक घटकांनी समृद्ध आणि अनेक प्रकारे उपयोगी, कॅलिफोर्निया बदाम सहजपणे रोजच्या दिनचर्येत समाविष्ट होतात, विशेषतः सकाळच्या सुरुवातीस. भिजवलेले बदाम, स्मूदी किंवा न्याहारीच्या बाउलमध्ये यांचा समावेश करता येतो. हे संतुलित आणि चांगली जीवनशैली स्वीकारण्यास मदत करतात. बदाम गिफ्ट म्हणून देणे हा सोपा मार्ग आहे की तुमची काळजी फक्त एका दिवसासाठी नाही, तर दररोजची आहे.

लहान आणि नियमित सवयी अनेकदा मोठा बदल घडवतात, आणि सकाळच्या सुरुवातीचा दिवसाच्या दिशेनिहाय परिणाम होतो. सकाळच्या दिनचर्येत कॅलिफोर्निया बदाम समाविष्ट करणे पोषण आणि ऊर्जा मिळवण्याची सोपी सुरुवात आहे. प्रोटीन, फायबर आणि हेल्दी फॅटसह 15 आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध बदाम रोजच्या आरोग्यासाठी सोपा आणि प्रभावी पर्याय आहे. ऋतिका समद्दार, रीजनल हेड – डायटेटिक्स, मॅक्स हेल्थकेअर, नवी दिल्ली, म्हणाल्या, "मी अनेकदा दिवसाची सुरुवात कॅलिफोर्निया बदाम खाण्याची शिफारस करते, कारण यात प्रोटीन आणि डायटरी फायबर चांगल्या प्रमाणात असतात. सकाळी नियमितपणे बदाम खाल्ल्याने ब्लड शुगर नियंत्रित करण्यास मदत मिळू शकते, फास्टिंग इन्सुलिन लेव्हल संतुलित राहू शकतो.

# रेल्वेत सर्वात मोठी भरती!

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

रेल्वेत सरकारी नोकरी करण्याची सुवर्णसंधी तुमच्याकडे आहे. रेल्वेत सध्या ग्रुप डी पदांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. या नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज करायचा आहे. तुम्ही अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्ज करायचा आहे.

रेल्वेत एकूण २२,१९५ पदांसाठी भरती होणार आहे.रेल्वेमधील या नोकरीसाठी निवड झाल्यावर उमेदवारांना बेसिक सॅलरी १८,००० रुपये मिळणार आहे. याबाबत अधिकृत वेबसाइटवर माहिती दिलेली आहे.त्यामुळे इच्छुकांनी अर्ज करण्याआधी संपूर्ण माहिती वाचायची आहे. रेल्वेत ग्रुप डी पदांसाठी भरती जाहीर केली आहे. या नोकरीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख २ मार्च २०२६ आहे.

# अडीच वर्षांपासून फरार असलेला आरोपी दमण येथून अटक

डांग : (समर्थ गांवकरी)

डांग जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी पोलिस प्रशासन अॅक्शन मोडमध्ये आले आहे. दीर्घकाळ पोलिसांना चकवा देणाऱ्या फरार आरोपींना पकडण्यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या होत्या.

डांग जिल्हा पोलिस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) तपासाची चक्रे वेगाने फिरवली. या कारवाईदरम्यान एलसीबीचे पीएसआय जे. जी. अणदकट आणि त्यांच्या पथकाला महत्त्वाचे यश मिळाले.

सन २०२३ मध्ये आहवा पोलीस स्टेशन येथे प्रोहिबिशन कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यातील मुख्य आरोपी अनिलभाई सुरेशभाई हलपती हा अडीच वर्षांपासून फरार होता. डांग एलसीबीला




मानवी गुप्त माहिती व तांत्रिक स्रोतांच्या आधारे खात्रीशीर माहिती मिळाली की आरोपी केंद्रशासित प्रदेश दमन मधील नानी दमन परिसरात लपून बसला आहे.

आरोपीने आपली ओळख लपवण्यासाठी पर्यटकाचा वेश धारण केला होता. तो गुलाबी रंगाचा हाफ स्लीव्ह टी-शर्ट व ग्रे रंगाची लोअर पँट परिधान करून फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहिती मिळताच एलसीबीचे पथक तात्काळ दमनकडे रवाना झाले. नानी दमन येथील जी.टी. चौकडी परिसरात फालुदाच्या गाडी जवळ सापळा रचण्यात आला.

वर्णनाशी जुळणाऱ्या व्यक्तीवर संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपीने दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला; मात्र कसून चौकशीअंती त्याने आपली ओळख अनिलभाई सुरेशभाई हलपती (रा. दोरी कडैया गाव, दमन) अशी कबूल केली.

अडीच वर्षे सतत ठिकाण बदलत आणि वेषांतर करून पोलिसांच्या नजरेतून बचाव करणारा आरोपी अखेर डांग पोलिसांच्या सतर्कतेमुळे जेरबंद झाला. या प्रोहिबिशन गुन्ह्यात यापूर्वी मनीषभाई ईश्वरभाई पटेल (रा. वलसाड), विरांगभाई उर्फ बंटो रमेशभाई राठोड (रा. सुरत) आणि प्रियंक उर्फ गोपी मुकेशभाई पटेल (रा. वापी) यांना अटक करण्यात आली होती.

अनिल हलपती याला अटक करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी आहवा येथे आणण्यात आले आहे.

# शोषित आश्रमशाळा शिक्षक-कर्मचाऱ्यांना न्याय द्या

**खासदार नीलेश लंके यांची केंद्रीय मंत्र्यांकडे मागणी**

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील खांडगाव (ता. पाथर्डी) येथील सद्गुरु रोहिदासजी अनुसूचित जाती प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेतील शोषित व वंचित शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

सदर आश्रम शाळेला २०१३ पासून शासन मान्यता असतानाही २००७ ते २०१९ या कालावधीत कार्यरत असलेल्या २० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संस्थेच्या संचालक मंडळाकडून वर्षानुवर्षे वेतन न देता सेवा करून घेण्यात आल्याचा गंभीर प्रकार खासदार लंके यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिला. केंद्र सरकारकडून नियमित अनुदान मिळत असतानाही कर्मचाऱ्यांचे शोषण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय मंत्रालयाच्या ५ नोव्हेंबर २०२० रोजीच्या आदेशानुसार गंभीर आर्थिक अनियमितता व गैरव्यवस्थापनामुळे संबंधित संस्थेच्या चारही प्रकल्पांचे अनुदान रद्द करण्यात आले असून संस्थेच्या संचालक मंडळाविरोधात १८ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्य पातळीवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचारी दोषी नसून तेच या अन्यायाचे बळी असल्याचे खासदार लंके यांनी ठामपणे नमूद केले.

२६ जुलै २०१० च्या शासन निर्णयानुसार तसेच मुंबई



प्राथमिक शिक्षण कायदा, १९४७ (सुधारित १९७८) अंतर्गत आश्रम शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता आदेश, सेवापुस्तिका व सेवेशी संबंधित लाभ देणे बंधनकारक आहे. तरीही संबंधित कर्मचाऱ्यांना आजपर्यंत हे लाभ मिळालेले नाहीत.

या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय मंत्र्यांकडे २०१३ पासून सर्व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देणे, तातडीने सेवापुस्तिका तयार करणे, केंद्र सरकारच्या ३३ अनुदानित आश्रम शाळांमध्ये योग्य समायोजन करणे तसेच दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना देय सेवा लाभ देण्याची मागणी केली आहे. वर्षानुवर्षे निष्ठेने सेवा बजावलेल्या या शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय देणे ही सामाजिक न्याय व्यवस्थेची नैतिक व संवैधानिक जबाबदारी असून या प्रकरणात सहानुभूतीपूर्ण व सकारात्मक निर्णय अपेक्षित असल्याचे खासदार लंके यांनी नमूद केले आहे.

# नेवासा तालुक्यात गोळीबारात तरूणाचा मृत्यू

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

नगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे गेल्या गुरुवारी सायंकाळी दोन गटांमध्ये गोळीबाराची घटना घडली असून या घटनेत एकजण ठार तर एकजण गंभीर जखमी झाला. नितीन शिरसाठ याचा मृत्यू झाला असून सुरज फुलमाळी याच्यावर पुणे येथे उपचार सुरु आहेत. गुरुवार दि. १२ रोजी सायंकाळी ६.३० वाजता घोडेगाव येथील घोडेश्वरी रूग्णालयासमोर दोन गटांमध्ये गोळीबाराची घटना घडली. यात नितीन शिरसाठ (वय-३३) यांच्या छातीवर गोळ्या लागल्याने त्याचा मृत्यू झाला. याच घटनेत सुरज फुलमाळी हा जखमी झाला. गोळीबाराची घटना पोलिसांना समजताच सोनईचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे, शिंगणापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके व पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

# उपनगरातील प्रभाग तीन मधील एकविरा चौक ते BSNL रस्त्याच्या निकृष्ट व प्रलंबित कामाविरोधात नागरिकांचे निवेदन

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

उपनगरातील एकविरा चौक ते BSNL कार्यालयादरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाबाबत स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या वर्षभरापासून या रस्त्याचे काम अत्यंत मंद गतीने सुरू असून अद्याप पूर्ण झालेले नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे.सदर रस्त्यावर खडीकरण करण्यात आले असले तरी त्यावर टाकण्यात आलेली कच (सैल खडी) मोठ्या प्रमाणात घसरण निर्माण करत आहे. त्यामुळे अनेक वाहनचालकांच्या गाड्या घसरून अपघात होत असून काहींना दुखापतीही झाल्या आहेत. तसेच रस्त्यावर उडणाऱ्या धूळ-मातीमुळे प्रदूषण वाढले असून परिसरातील व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या संदर्भात सर्व नागरिकांच्या



वतीने महापौर सौ. ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव व आयुक्त यशवंत डांगे यांना मनसुख वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले.यावेळी डॉ. हेमंत सोले,विजय वाघ,जयंत देशमुख,अजिंक्य शिंदे,कुडाळ आदी सह नागरिक उपस्थित होते. रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करून दर्जेदार पद्धतीने करण्यात यावे, तसेच संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाचे या कामाकडे कोणतेही लक्ष नसल्याने रस्त्याच्या दर्जा व गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. चेंबर वरती झाकण नाही त्यामुळे पोलिथिन त्या मधी जाऊन नळी बंद झाली आहे त्यामुळे झालेला मोठा खर्च वाया जात आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला ड्रेनेज लाइन मान्यता असून काही ठिकाणी तर नवीन लाईन टाकलीच नाही लाईट चे जुने इलेक्ट्री पोल अजुन काढले नाहीत.

# एचपीकडून घरगुती वापरासाठी नवीन डेस्कजेट प्रिंटर्स लॉन्च

मुंबई : (समर्थ गांवकरी)

एचपीने भारतात डेस्कजेट ऑल-इन-वन (एआयओ) प्रिंटरची एक नवीन श्रेणी सादर केली आहे. ती विद्यार्थी, पालक आणि व्यावसायिकांसाठी होम प्रिंटिंग अधिक स्मार्ट, सोपी आणि अधिक सहज बनवण्यासाठी डिझाइन केलेली आहे. या उत्पादन श्रेणीत एचपी डेस्कजेट, एचपी डेस्कजेट इंक अॅडव्हान्टेज आणि एचपी डेस्कजेट अल्ट्रा इंक अॅडव्हान्टेजमधील चार मॉडेल्स समाविष्ट आहेत. ते दैनंदिन घरगुती कामांत सुलभता, कार्यक्षमता आणि किफायतशीर दरांचे संतुलन आणतात. दैनंदिन छपाईच्या गरजांसाठी उपयुक्त नवीन डेस्कजेट ऑल-इन-वन (एआयओ) मालिका घरगुती छपाईला सहज आणि विश्वासार्ह बनवते. या श्रेणीत साधे प्रिंटिंग आणि स्कॅनिंगपासून ते उच्च-व्हॉल्यूम प्रिंटिंगपर्यंत, स्वयंचलित



दस्तऐवज फीडिंगसारख्या अतिरिक्त सोयीस्कर वैशिष्ट्यांसह वेगवेगळ्या घरगुती छपाईच्या गरजांसाठी डिझाइन केलेले मॉडेल्स समाविष्ट आहेत. ते व्यत्यय टाळण्यासाठी स्वयं दुरूस्ती तंत्रज्ञानासह विश्वसनीय ड्युअल-बँड वाय-फाय® सह येते आणि घरात कुठूनही सोपे प्रिंट, स्कॅन आणि कॉपी कार्यक्षमतादेखील देते. कमी किमतीच्या, उच्च-उत्पादन देणाऱ्या मूळ एचपी आयएनसीसह ही मालिका असाइनमेंट, प्रकल्प आणि दैनंदिन कामाच्या कागदपत्रांसाठी उत्तम रंगांमध्ये मजकुराची छपाई करते.

# अहिल्यानगर जिल्हा रूग्णालयाकडून दिव्यांगांच्या तपासणीला नकार; डॉक्टरांचा निर्णय

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

जिल्हा शासकीय रूग्णालयात दर बुधवारी होणारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया बुधवारी अचानक ठप्प झाल्याने जिल्हाभरातून आलेल्या दिव्यांग बांधवांचे मोठे हाल झाले. दिव्यांग बोर्डावरील डॉक्टरांनी एका सामाजिक संस्थेकडून होत असलेल्या कथित बदनामीचा निषेध करत तपासणी व प्रमाणपत्र वितरणाचे काम बंद ठेवण्याचा निर्णय घेतला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या हस्तक्षेपानंतर केवळ १०० टक्के दिव्यांग




असलेल्या रूग्णांची तपासणी करण्यात आली, तर इतरांना तपासणीविना माघारी जावे लागले.

जिल्हा शासकीय रूग्णालयात दिव्यांग तपासणीसाठी अधिकृत बोर्ड कार्यरत आहे.या बोर्डामार्फत दर बुधवारी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून येणाऱ्या दिव्यांगांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र अत्यावश्यक असल्याने दर आठवड्याला मोठ्या संख्येने दिव्यांग व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती असते.

अनेकांना येण्या-जाण्याचा खर्च, प्रवासाची गैरसोय आणि सोबत एका व्यक्तीची गरज भासते. मात्र बुधवारी सकाळी रूग्णालयात पोहोचलेल्या दिव्यांगांना तपासणी प्रक्रिया बंद असल्याचे समजताच नाराजीचा सूर उमटला. काहींनी लांबच्या तालुक्यांतून प्रवास करून आले असल्याचे सांगितले. दरम्यान, दिव्यांग बोर्डावरील सर्व डॉक्टरांनी सोमवारी (९ फेब्रुवारी) जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. घोगरे यांना पत्र देत, गेल्या एक वर्षापासून एका सामाजिक संस्थेकडून सातत्याने बदनामी होत असल्याचा आरोप केला. या पार्श्वभूमीवर आम्ही दिव्यांग बोर्डावर काम करणार नाही, असा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तपासणीसाठी अधिकृत अधिकार बोर्डावरील डॉक्टरांकडेच असल्याने व पर्यायी यंत्रणा नसल्यामुळे डॉ. घोगरे यांनी डॉक्टरांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. दिव्यांगांचे हाल लक्षात घेऊन त्यांनी कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली.

त्यानंतर केवळ १०० टक्के दिव्यांग असलेल्या रूग्णांची तपासणी करण्यात आली; मात्र इतर दिव्यांगांना प्रमाणपत्र न मिळाल्याने निराश होऊन परतावे लागले. दरम्यान, पुढील बुधवारी दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वितरण नियमितपणे होणार की नाही, याबाबत अनिश्चितता कायम आहे. प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करून सेवा सुरळीत करण्याची मागणी दिव्यांग बांधवांकडून होत आहे.

# कळवण अवैध गौण खनिज उत्खननाचा धुमाकूळ

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यातील ओतूर, नरूळ, वडाळे वणी आणि आठंबे खोऱ्यात सध्या अवैध गौण खनिज उत्खननाने अक्षरशः थैमान घातले आहे. दगड, मुरूम आणि मातीचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन दिवसा ढवळ्या सुरू असून शासनाच्या महसुलाला कोट्यवधींचा फटका बसत असल्याचे चित्र आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कागदोपत्री ५० ते १०० ब्रास इतकी रॉयल्टी दाखवली जाते; मात्र प्रत्यक्षात ४००–५०० ब्रासपेक्षा जास्त खनिजाची वाहतूक केली जाते. म्हणजेच शासनाच्या महसुलाची उघडपणे चोरी होत असतानाही संबंधित विभाग "सर्व काही कायदेशीर आहे" असा आव आणत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

अतिरिक्त लोडिंग केलेले डंपर आणि ट्रॅक्टर रस्त्यावरून बेफाम धावत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. गावातील अरुंद रस्ते, शाळेजवळून जाणारी वाहतूक आणि रात्री-दिवसा सुरू असलेली धूळधाण यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था बिकट झाली असून, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पर्यावरणाची हानी; भविष्यासाठी धोक्याची घंटा खोऱ्यातील नैसर्गिक जलप्रवाह, शेतीजमिनी आणि झाडझुडपे यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पावसाळ्यात भूस्खलन आणि पूरस्थितीचा धोका वाढू शकतो, अशी भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. काही वर्षांपूर्वी शांत असलेली ही खोरे आता खड्ड्यांनी विद्रूप झाली आहेत. संबंधित विभागाचे अधिकारी सर्व परवाने आणि कागदपत्रे वैध असल्याचे सांगत असले तरी, प्रत्यक्ष उत्खननाच्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह आहे. महसूल, खनिज व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> संबंधित विभागाचे अधिकारी सर्व परवाने आणि कागदपत्रे वैध असल्याचे सांगत असले तरी, प्रत्यक्ष उत्खननाच्या प्रमाणावर प्रश्नचिन्ह आहे. महसूल, खनिज व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी जोर धरत आहे.



ठाणे : ठाण्यातील अवघ्या ७ वर्षांच्या रियांश सानिका दीपक खामकरने अरबी समुद्रात ३० किमी एकट्याने पोहून विश्वविक्रम प्रस्थापित केला. 15 नोव्हेंबर 2025 रोजी 7 तास 30 मिनिटे 11 सेकंदांत हे अंतर पोहून पूर्ण केलेल्या त्यांच्या पराक्रमाची नोंद लंडन वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. रियांश खामकरने 'स्टारफिश स्पोटर्स फाऊंडेशनचे प्रशिक्षक कैलाश आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे धडे घेत असून ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे नियमित सराव करीत आहे.

## थोडक्यात बातम्या...



### नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांची उपविभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा

किनवट (स. गांवकरी) : नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी झेनित चंद्रा दोंतुला यांची भेट घेऊन शहरातील विविध विकासकामे व प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा केली. यावेळी पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, स्वच्छता मोहीम, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण निर्मूलन आदी विषयांवर सविस्तर आढावा घेण्यात आला. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.बैठकीस रोहन येंड्रलवार व ॲड. येऊतकर उपस्थित होते. प्रशासनाकडून मांडण्यात आलेल्या विषयांवर सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन देण्यात आले.

### नगर तालुक्यात व्यावसायिकाची हत्या; पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : हॉटेलमधील काचेचे फर्निचर फोडल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरणगाव येथील एका व्यावसायिकाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या गंभीर मारहाणीत जखमी झालेल्या मिठु कार्तिक दत्त यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेली माहिती अशी की, कोमल फरसान मार्ट आणि हॉटेलचे मालक भाऊसाहेब विश्वनाथ नांगरे व जावेद छोटू आतार (दोघे रा. वाळकी) यांच्याशी मयत मिठु दत्त यांचा फर्निचरच्या नुकसानीवरून वाद झाला होता. या वादाचा राग मनात धरून आरोपी भाऊसाहेब नांगरे, जावेद आतार आणि त्यांच्या हॉटेलमधील तीन कामगारांनी मिळून ६ मार्च २०२५ रोजी आरणगाव येथील 'अजय फॅब्रिकेशन' दुकानात घुसून दत्त यांना लाथाबुक्क्यांनी व शस्त्राने गंभीर मारहाण केली. या हल्ल्यानंतर जखमी दत्त यांना तातडीने उपचारासाठी पुणे येथील ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, १७ दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर २३ मार्च रोजी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी केला असून, त्यांच्या फिर्यादीवरून पाचही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व इतर कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने या घटनेचा पुढील तपास करत आहेत.



### पिंपळगाव निपाणी येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

पिंपळगाव निपाणी (स. गांवकरी) : जेवढे मंदिर सुंदर असायला हवे तेवढीच सुंदर आपली मराठी शाळा असायला हवी.आपल्याला या पिढीला सुसंस्कारित पिढी निर्माण करायची असेल,व्यसनांपासून दूर ठेवायचे असेल तर पहिले आपण बदललो पाहिजे,तुम्ही निवडणुकीत राजकारण जरूर करा. पण शाळेत, देवळात,जत्रेत राजकारण आणले तर या नव्याने तयार होणाऱ्या पिढीने आपला काय आदर्श घ्यावा अशा आशयाचे प्रतिपादन पिंपळगाव निपाणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलनात तालुक्यातील कार्यसम्राट आमदार डॉ किरण लहामटे यांनी केले.

तालुक्यातील पिंपळगाव निपाणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच मोठ्या थाटामाटात उद्योजक बाबासाहेब दळवी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.या कार्यक्रमाची सुरुवात आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज,माता सरस्वती मातेच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रम प्रसंगी तालुक्यातील कार्यसम्राट आमदार डॉ किरण लहामटे,भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य जालिंदर वाकचौरे,गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत,बीट विस्तार अधिकारी अनिल गायकवाड,केंद्र प्रमुख सुनील घुले,कुंभेफळ केंद्रप्रमुख बाळासाहेब आरोटे,राजेंद्र सदगीर सरपंच दत्तात्रय डगळे,उपसरपंच शांताराम वाकचौरे, पोलिस पाटील संतोष वाकचौरे,ग्रामपंचायत सदस्य भिमाजी तोरमल,नामदेव गोर्डे वि.का.सो.चे माजी चेअरमन बबनराव तोरमल,प्रगतशील शेतकरी वसंत वाकचौरे,माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक वैभव दराडे,वाशेरेचे सरपंच किरण गजे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन तोरमल, उपाध्यक्ष अनिल वाकचौरे,सदस्य गणेश तोरमल,शरद गोर्डे,मोनिका गोर्डे,प्रियांका वाकचौरे, तुकाराम वाकचौरे,सतीश वाकचौरे ,पत्रकार संदीप दातखिळे,पत्रकार दत्तात्रय हासे आदी मान्यवर उपस्थित होते.या मान्यवरांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## सोनोशी शाळेची खो-खो स्पर्धेत ऐतिहासिक यशाची नोंद

- मैदान नसतानाही जिल्हा अजिंक्य केला!
- जिद्दीच्या बळावर इतिहास घडवणारी सोनोशी शाळा

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

इतिहास घडवण्यासाठी मोठी मैदाने, आलिशान सुविधा किंवा वर्षानुवर्षांचा सरावच लागतो असे नाही;तर जिद्द, नियोजन, मेहनत आणि विद्यार्थ्यांवरील विश्वास असला की अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात, हे पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनोशी यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.




नुकत्याच पार पडलेल्या अहिल्यानगर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा त्रिमूर्ती पब्लिक स्कूल नेवासा फाटा च्या भव्य मैदानात संपन्न झाल्या.या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा जिल्ह्यातील सर्व चौदा तालुक्यांनी सहभाग नोंदविला त्या स्पर्धेत पाथर्डी तालुक्यातील स्वतःचे मैदान नसलेल्या या ग्रामीण शाळेने जिल्हाभरातील मातब्बर संघांना मागे टाकत ऐतिहासिक यशाची नोंद केली आहे. आज संपूर्ण जिल्ह्यात शिक्षण, क्रीडा आणि प्रशासन क्षेत्रात "सोनोशी शाळा" हे नाव अभिमानाने घेतले जात आहे.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सोनोशी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले— लहान गट मुली खो-खो – जिल्हा अजिंक्यपद, मोठा गट मुली खो-खो – जिल्हा अजिंक्यपद, लहान गट मुले खो-खो – जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक,लांब उडी (वैयक्तिक) – जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक

एकाच वर्षात चार पारितोषिके पटकावत सोनोशी शाळेने पाथर्डी तालुक्याच्या क्रीडा इतिहासात सुवर्णअक्षरांनी आपले नाव कोरले आहे.

परंपरागत बलाढ्य तालुक्यांना जोरदार धक्का

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये अकोले, कर्जत, पारनेर, कोपरगाव यांसारख्या तालुक्यांचे वर्चस्व अनेक वर्षांपासून अबाधित राहिले आहे.भरपूर मैदाने, नैसर्गिक सुविधा, प्रशिक्षक आणि वर्षभर चालणारा सराव यामुळे हे तालुके इतरांसाठी मोठे आव्हान ठरत असत.पाथर्डी,शेवगावसारखे तालुके अनेकदा केवळ "सराव सामने खेळणारे संघ" म्हणून पाहिले जात होते.मात्र यावर्षी सोनोशी शाळेने पहिल्याच दिवसापासून ठाम भूमिका घेतली. आणि ही भूमिका त्यांनी केवळ शब्दांत नव्हे, तर मैदानावरील प्रत्येक सामन्यात कृतीतून सिद्ध केली. दोनही दिवस जिल्हास्तरीय मैदानावर फक्त आणि फक्त पाथर्डी तालुक्याची चर्चा रंगलेली होती.

## सभामंडपाचे भूमिपूजन; विकासाच्या वचनाला नवी गती

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील तिखोल (ता. पारनेर) येथे महादेव मंदिरासमोरील सभामंडप बांधकामाच्या कामाचे भूमिपूजन डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या कामामुळे गावाच्या धार्मिक व सामाजिक जीवनाला नवसंजीवनी मिळणार आहे.

या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर गावचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, अक्षय गोरडे यांसह गावातील माजी सरपंच सुभाष ठाणगे, माजी उपसरपंच विठ्ठल ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य राघू ठाणगे, नबाजी मंचरे, भाऊसाहेब ठाणगे, सखाराम मंचरे, पोपट मंचरे, शिवाजी धोंडिबा ठाणगे, अमोल ठाणगे, अशितोष ठाणगे, सतीश ठाणगे, गोरक्ष आग्रे, भास्कर ठाणगे, संदिप ठाणगे, आप्पा ठाणगे, रावसाहेब टिकल, रंगनाथ ठाणगे, महादू ठाणगे, आनंदा ठाणगे, बाळू ठाणगे, बाळासाहेब ठाणगे, भानुदास ठाणगे, सोनू मंचरे, नशीर तांबोळी, रामदास ठाणगे, बबन मेजर, विजय ठाणगे, हरिभाऊ ठाणगे, शाम ठाणगे, गणेश ठाणगे, भगवंत ठाणगे, नामदेव ठाणगे, भागा ठाणगे, अशोक ठाणगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते यांनी सांगितले की, "मतदारसंघातील सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे.

## एका लिपिकाला लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक

**मुंबई/अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील प्रशासकीय यंत्रणेत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी मोठी कारवाई मंत्रालयात उघडकीस आली आहे. भ्रष्टाचारविरोधी पथकाने (एसीबी) अन्न व औषध प्रशासन विभागातील एका लिपिकाला लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. या घटनेमुळे मंत्रालय परिसरात खळबळ उडाली असून, प्रशासनातील भ्रष्टाचाराबाबत पुन्हा एकदा चर्चा रंगल्या आहेत.

या कारवाईत अटक करण्यात आलेला कर्मचारी राजेंद्र ढेरंगे असल्याची माहिती समोर आली आहे. तक्रारदार व्यावसायिक असून, त्याच्या मेडिकल दुकानाचा निलंबित परवाना पूर्ववत करून देण्याच्या प्रक्रियेत लाच मागण्यात आली होती. या प्रकरणावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सरकारवर तीव्र टीका केली आहे. एसीबीने मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागात सापळा रचत लिपिकाला लाच स्वीकारताना पकडले. प्राथमिक माहितीनुसार, परवाना पूर्वरत करण्यासाठी सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. तडजोडीनंतर ३५ हजार रुपये स्वीकारताना आरोपीला रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावर करण्यात आली. सदर कारवाई अलीकडेच मुंबईतील मंत्रालयात पार पडली. कारवाईदरम्यान एसीबीचे अधिकारी संबंधित कार्यालयात दाखल झाले आणि तपासाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आरोपी लिपिकाला ताब्यात घेण्यात आले. काही काळासाठी कार्यालय बंद ठेवून चौकशी करण्यात आली, त्यानंतर नियमित कामकाज सुरू करण्यात आले. मेडिकल व्यवसायाचा निलंबित परवाना पूर्ववत करून देण्यासाठी लाच मागितल्याची तक्रार एसीबीकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या आधारे सापळा रचण्यात आला. सरकारी कामासाठी आर्थिक मोबदल्याची मागणी केल्याने भ्रष्टाचाराचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## आज नाशिक ते जगन्नाथ पुरी ओडीशा पर्यंत निघणार राष्ट्रीय गौरव यात्रा

- १९ फेबुवारी रोजी जगन्नाथ पुरी येथे होणार भव्यदिव्य शिवजन्मोत्सव सोहळा पडणार पार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

छावा भारत क्रांती मिशनच्या वतीने या वर्षी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीक्षेत्र जगन्नाथ पुरी, ओडिशा येथे राष्ट्रीय शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. नाशिक ते जगन्नाथ पुरी राष्ट्रीय गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ते २१ फेब्रुवारी पर्यंत ही रथ यात्रा असणार आहे. या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा राष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावी प्रसार होईल, तसेच कार्यक्रमाची शोभा व प्रेरणादायी महत्त्व निश्चितच अधिक वाढेल. छत्रपती शिवाजी महाराजांची कीर्ती जगभर पोहोचावी या उद्देशाने छावा भारत क्रांती मिशन माध्यमातून दरवर्षी देशातील विविध राज्यांमध्ये राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात येतो. त्याच परंपरेनुसार यंदा हे १७ वर्ष आहे. दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजीचा राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळा श्रीक्षेत्र जगन्नाथ पुरी, ओडिशा येथे संपन्न होणार असल्याची माहिती छावा भारत क्रांती मिशन चे राष्ट्रीय डॉ विलासभाऊ पांगारकर यांनी दिली.




या सोहळ्याच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यातून विशेष प्रारंभ करण्यात येणार असून शनिवारी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी नाशिक जिल्ह्याचे ग्रामदैवत कालिकामाता मंदिर येथून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा असलेला रथ ढोल-ताशांच्या गजरात, नारळ फोडून, नाशिक जिल्ह्यातील सर्व शिवभक्तांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ करण्यात येणार आहे.यावेळी सिंहस्थ कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शिक्षण मंत्री दादा भुसे महापौर हिमगौरी आडके, उप महापौर विलास शिंदे, पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, खासदार राजाभाऊ वाजे, माजी खासदार हेमंत गोडसे, आमदार सीमा हिरे, शिवसेनेचे अजय बोरस्ते आदि संह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहतील.

छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव यात्रा अश्वारूढ रथ सह सिन्नर, वावी पांगरी, शिर्डी समृद्धी हायवे, छत्रपती संभाजी नगर, शिंदखेड राजा, नागपूर , छत्तीसगडची राजधानी रायपुर व ओडिशा राज्यातील संभलपुर, कटक, भुवनेश्वर मार्ग ही रथ यात्रा पुरी धाम येथे पोहोचेल.

महाराष्ट्र, छत्तीसगड व ओडिशा या तीन राज्यांतील विविध जिल्ह्यांमधून प्रवास करणार असून, या दरम्यान हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सवाचा जागर केला जाणार आहे. जगन्नाथ पुरी येथील

कार्यक्रमास राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, ओडीशाचे (राज्यपाल) मा.डॉ. श्री. कंभमपती हरिबाबु, ओडिशा मुख्यमंत्री मोहन चरणजी मांझी,केंद्रीय राज्यमंत्री रामदासजी आठवले, केंद्रीय आयुष्यं राज्यमंत्री प्रतापराव जाधव, ओडिशाचे उपमुख्यमंत्री कनक वर्धन सिंह देव, सुदर्शन न्यूजचे संचालक सुरेशजी चव्हाणके, राष्ट्रीय कुंभमेळा प्रवक्ता महंत भक्ती चरणदास महाराज, शिवाजीराजे जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

त्याच प्रमाणे राष्ट्रीय गौरव यात्रेचे ठीक ठिकाणी भव्य स्वागत करण्यात येईल. छत्तीसगड रायपूर येथे येथील मुख्यमंत्री विष्णूदेव सहाय, माजी मुख्यमंत्री रमण सिंग यांच्यासह येथील मराठी बांधव या रथयात्रेचे भव्य दिव्य स्वागत करणार आहे. या कार्यक्रमासाठी छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर,मुख्य मार्गदर्शक शिवाजीराजे जाधव सिंदखेडा राजा, छावा भारत क्रांती मिशनचे मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, छावा भारत क्रांति मिशन चे संघटक परमेश्वर नलावडे पाटील, मार्गदर्शक किशोर चव्हाण,छावा क्रांतीवीर सेनेचे करण गायकर , हरियाणाचे रामनारायण मराठा, भिलवाडा राजस्थानचे शशिकांत पवार, ओडिशा समन्वयक निबेदिता नायक, रमेश हिरवे, जानकी बिल्लाव, शत्रुघ्न सारंगी, मिडिया समन्वयक अमोल सोनवणे,अतुल पांगारकर,विष्णू पांगारकर आदी परिश्रम घेत आहेत.

## पडघे परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत ; लहान मुलांसह नागरिकांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या

### महिन्यापूर्वी श्वानदंशामुळे चिमुरड्याचा रेबीजने झाला होता मृत्यू; प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

भिवंडी तालुक्यातील पडघे परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांसह अनेक नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना सातत्याने घडत असून, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. महिन्यांपूर्वी पडघे परिसरातील बोरीवली, खलील कॉलनी येथे घराबाहेर खेळत असताना एका चिमुरड्याला भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. या घटनेनंतर उपचार सुरू असतानाच राहील रियाज शेख (वय ४ वर्षे) या निष्पाप चिमुरड्याचा रेबीजमुळे मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पडघा परिसरात बिल्डिंग परिसर, कचरापेट्या, बाजारपेठ आणि गल्लीबोळांमध्ये मोठ्या प्रमाणात भटकी कुत्री फिरताना दिसत आहेत. ही कुत्री समूहाने फिरत असून, रात्री-अपरात्री वाहनचालकांच्या मागे धाव घेतात आणि अनेकदा चावा घेतात. तसेच पदपथावरून जाणाऱ्या लहान मुलांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर हल्ला केल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातही भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत असून, भरदिवसा देखील नागरिकांना बाहेर पडणे कठीण झाले आहे. विशेषतः शाळकरी मुले आणि लहान चिमुरड्यांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये चिंता वाढली आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दरम्यान, बोरीवली ग्रामपंचायतीने भटक्या आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भिवंडी महानगरपालिका, पडघा पोलीस ठाणे आणि वनविभागाकडे निवेदन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता, कुत्रा चावल्याच्या घटनांची अधिकृत आकडेवारी मिळू शकली नाही. त्यामुळे परिसरातील श्वानदंशाच्या घटनांचे नेमके प्रमाण स्पष्ट होऊ शकलेले नाही.दरम्यान, पडघा परिसरातील नागरिकांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



> काही महिन्यांपूर्वी माझ्या मुलाला कुत्रा चावल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन इतरांचे जीव वाचवावेत,
>
> **-रियाज शेख ,बोरीवली**
>
> मला कुत्रा चावल्यानंतर सायन रुग्णालयात १५ दिवस उपचार घ्यावे लागले. माझी प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे
>
> **- विश्वनाथ सोष्टे ,कुरुंद**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)